महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन उपक्रम)
सीआयएन : यु४०१०९एमएच२०००५एसजीसी१५३६४५
दुरध्वनी क्र. २६४७४७५३ (वै)/२६४७४२११ (का)
फॅक्स क्र. २६४७२३६६
ईमेल : cecomm@mahadiscom.in
संकेतस्थळ : www.mahadiscom.in
प्लॉट क्र. जी-९, प्रकाशगड
प्रो. अनंत काणेकर मार्ग,
वांद्रे (पूर्व)
मुंबई- ४०० ०५१

**पी.आर-३/सबसिडी/३५८०४** **दिनांक :०४/१२/२०१४.**

# वाणिज्य परिपत्रक क्र. २३३

**विषय** :- सन २०१४-१५ च्या खरीप हंगामातील सुधारीत हंगामी पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी असलेल्या गावांमध्ये विविध उपाययोजना जाहीर करण्याबाबत.

- **विज बिलात ३३.५ टक्के इतकी सुट व टंचाईसदृश्य परिस्थिती जाहीर केलेल्या गावातील कृषी ग्राहकांचा वीज पुरवठा खंडीत न करणे.**

**संदर्भ** :- १) शासन निर्णय क्र. एससीवाय २०१४/प्र.क्र. २०१/म-७ दिनांक १९/०८/२०१४.
२) वाणिज्य परिपत्रक क्र. २२७ दि.५.९.२०१४.
३) शासन निर्णय क्र. एससीवाय २०१४/प्र.क्र. २०१/म-७ दिनांक २५/०८/२०१४.
४) शासन निर्णय क्र. एससीवाय २०१४/प्र.क्र. २३१/म-७ दिनांक २५/११/२०१४.

शासनाने संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयाद्वारे ५० टक्केपेक्षा कमी पर्जन्यमान झालेल्या १२३ तालुक्यांमध्ये टंचाईसदृश्य परिस्थिती जाहीर केलेली होती. त्या अनुषंगाने सदर १२३ तालुक्यांतील कृषीपंपाच्या चालू वीज बिलामध्ये ३३ टक्के सवलत देण्याचे आदेश दिलेले होते. सदर आदेशाची अंमलबजावणी करण्याकरीता संदर्भ क्र. २ मधील वाणिज्य परिपत्रकान्वये सर्व क्षेत्रिय कार्यालयांना कृषी ग्राहकांच्या वीज बिलात सवलत देण्याचे निर्देश देण्यात आलेले होते. तसेच संदर्भातील क्र. ३ च्या शासन निर्णयान्वये शासनाने आणखी टंचाईसदृश्य १५ तालुक्यांचा समावेश केलेला आहे. सदर तालुक्यातील कृषी ग्राहकांना सुध्दा वाणिज्य परिपत्रक क्र. २२७ दि.५.९.२०१४ मध्ये नमुद केलेली सवलत लागू होती.

शासनाने संदर्भातील शासन निर्णय दि. १९.०८.२०१४ व २५.०८.२०१४ अधिक्रमित (रद्द) करुन संदर्भ क्र.४ च्या शासन निर्णयान्वये सन २०१४-१५ च्या खरीप हंगामातील पिकांची सुधारीत हंगामी पैसेवारी जाहीर केलेली आहे. सदर शासन निर्णयानुसार १९०५९ गावांमध्ये टंचाईसदृश्य परिस्थिती जाहीर केलेली आहे. शासनाच्या सदर निर्णयानुसार टंचाईसदृश्य गावांमध्ये (परिशिष्ट अ) खालीलप्रमाणे सवलती लागु करण्याबाबत सर्व क्षेत्रिय कार्यालयांना निर्देशित करण्यात येत आहे.

१) टंचाईसदृश्य गावातील कृषी ग्राहकांना वीज बिलात शासनाच्या प्रचलित सवलतीच्या दरामध्ये ३३.५टक्के सुट देण्यात यावी.

२) टंचाईसदृश्य गावातील कृषी पंपाची विज जोडणी खंडीत करण्यात येऊ नये.

सर्व क्षेत्रिय कार्यालयांना कळविण्यात येते की, शासनाने शासन निर्णय दि. १९.०८.२०१४ व २५.०८.२०१४ अधिक्रमित केल्यामुळे वाणिज्य परिपत्रक क्र. २२७ दि.०५.०९.२०१४ रद्द झाले असे समजण्यात यावे. तसेच शासनाच्या सुधारीत आदेशानुसार स्थानिक जिल्हाधिकारी कार्यालयातुन सन २०१४-१५ च्या खरीप हंगामातील सुधारीत हंगामी पैसेवारी ५० पैसे वा त्यापेक्षा कमी आलेली आहे अशा गावांची यादी प्राप्त करावी. शासन निर्णयानुसार टंचाईसदृश्य गावांतील (परिशिष्ट अ) कृषी ग्राहकांना सन २०१४-१५ या वर्षात विज बिल देयकामध्ये ३३.५ टक्के सवलत दिल्यामुळे शासनावर पडणा-या आर्थिक भाराच्या रकमेची परिगणना माहिती व तंत्रज्ञान विभागाने करावी जेणेकरुन शासनाकडे प्रतिपूर्तीच्या रकमेच्या पुढील कार्यवाहीसाठी प्रस्ताव पाठविण्यात येईल.

**सहपत्र :-** वरीलप्रमाणे.

**मुख्य अभियंता (वाणिज्य)**

**प्रत सस्नेह रवाना :-**

१) सर्व मुख्य अभियंता, सं व सु परिमंडळ (महावितरण)

२) मुख्य महाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान), महावितरण, मुंबई.

-- आपणास कळविण्यात येते की, वरील विषया संदर्भात टंचाईसदृश्य गावांतील कृषी ग्राहकांना सन २०१४-१५ च्या वीज बिलात शासनाच्या प्रचलित सवलतीच्या दरामध्ये ३३.५ टक्के सवलत देण्यात यावी व दिलेल्या सवलतीपोटी वितरण कंपनीवर पडणा-या आर्थिक भाराची परिमंडळ व ग्राहक संख्यानिहाय माहिती त्वरीत पाठविण्यात यावी. जेणेकरुन शासनाकडून आर्थिक पूर्तता: करण्याकरीता प्रस्ताव पाठविण्यास मदत होईल. तसेच शासनाकडून अनुदानाची रक्कम प्राप्त झाल्यावर सदर रक्कम कृषी ग्राहकांच्या विज देयकातुन वळती करण्यात यावी.

३) मुख्य महाव्यवस्थापक (सांघिक वित्त), महावितरण, मुंबई.

**प्रत रवाना :- प्रेषण यादीप्रमाणे**

## शासन निर्णय , महसूल व वन विभाग क्रमांक - एससीवाय- २०१४/ प्र.क्र.२३१/म-७

## दिनांक :- २५ नोव्हेंबर, २०१४

## सन २०१४-१५ सालातील खरीप पिकांच्या सुधारीत हंगामी पैसेवारीचा गोषवारा

## परिशिष्ट -"अ"

| अ.क्र. | विभाग | जिल्हा | पैसेवारी जाहीर केलेली गावे | ५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी असलेली गावे | ५० पैशांपेक्षा जास्त पैसेवारी असलेली गावे |
|---|---|---|---|---|---|
| १ | कोकण | ठाणे | ९०७ | ० | ९०७ |
| | | पालघर | ९८० | ० | ९८० |
| | | रायगड | १८८८ | ० | १८८८ |
| | | रत्नागिरी | १५११ | ० | १५११ |
| | | सिंधुदुर्ग | ७३७ | ० | ७३७ |
| | एकूण | | **६०२३** | **०** | **६०२३** |
| २ | नाशिक | नाशिक | १९६० | ११६६ | ७९४ |
| | | धुळे | ६७६ | १०८ | ५६८ |
| | | नंदुरबार | ८८३ | ० | ८८३ |
| | | जळगांव | १५०१ | २०३ | १२९८ |
| | | अहमदनगर | ५८१ | ३०५ | २७६ |
| | **एकूण** | | **५६०१** | **१७८२** | **३८१९** |
| ३ | पुणे | पुणे | १३०२ | ० | १३०२ |
| | | सातारा | १४८९ | ३ | १४८६ |
| | | सांगली | ६३१ | ० | ६३१ |
| | | सोलापूर | ८०% पेक्षा जास्त क्षेत्रावर खरीप पिकांची लागवड झालेली नसल्याने सुधारीत हंगामी पैसेवारी निरंक | | |
| | | कोल्हापूर | १२१२ | ० | १२१२ |
| | **एकूण** | | **४६३४** | **३** | **४६३१** |
| ४ | औरंगाबाद | औरंगाबाद | १३५३ | १३०७ | ४६ |
| | | जालना | ९२९ | ९२९ | ० |
| | | परभणी | ८४८ | ८४८ | ० |
| | | हिंगोली | ७०७ | ७०७ | ० |
| | | नांदेड | १५७५ | १५७५ | ० |
| | | बीड | १४०३ | १३७७ | २६ |
| | | लातूर | ९४३ | ९४३ | ० |
| | | उस्मानाबाद | ३८१ | ३१८ | ६३ |
| | **एकूण** | | **८१३९** | **८००४** | **१३५** |

| अ.क्र. | विभाग | जिल्हा | पैसेवारी जाहीर केलेली गावे | ५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी असलेली गावे | ५० पैशांपेक्षा जास्त पैसेवारी असलेली गावे |
|---|---|---|---|---|---|
| ५ | अमरावती | अमरावती | १९८१ | १९८१ | ० |
| | | अकोला | ९९७ | ९९७ | ० |
| | | यवतमाळ | २०५० | २०५० | ० |
| | | बुलडाणा | १४२० | १४२० | ० |
| | | वाशिम | ७९३ | ७९३ | ० |
| | **एकूण** | | **७२४१** | **७२४१** | **०** |
| ६ | नागपूर | नागपूर | १७९५ | ५२५ | १२७० |
| | | वर्धा | १३४१ | १०४९ | २९२ |
| | | भंडारा | ८४७ | ७ | ८४० |
| | | गोंदिया | ९२१ | ० | ९२१ |
| | | चंद्रपूर | १३९६ | ४४८ | ९४८ |
| | | गडचिरोली | १४९६ | ० | १४९६ |
| | **एकूण** | | **७७९६** | **२०२९** | **५७६७** |
| **राज्याची एकूण** | | | **३९४३४** | **१९०५९** | **२०३७५** |